**नगर परिषद मलकापूर जि बुलढाणा**

**विशेष सभा दि 22/12/2021 सभेचे कार्यवृत्त**

मा अध्यक्ष नोटीस क्र नपम अध्यक्ष सभाकामकाज 3138/2021 दि 17/12/2021 नुसार आज दि 22/12/2021 ला विशेष सभा बोलविण्यात आली एकुण 32सदस्यांपैकी 27 सदस्य सभेस उपस्थित होते सभेसाठी आवश्यक असणारी गणपूर्ती झाल्यावर मा अध्यक्ष महोदय यांचे आदेशानुसार सभेचे कामकाज सुरु करण्यात आले

**विषय क्र 1- मलकापूर TP स्कीम क्र 1 भूखंड क्र 248 नगर परिषद शाळा क्र 4 जागेबाबत न प ठराव क्र 46 दिनांक 04.05.2016बाबत विचार विनिमेय करून न प द्वारे विकसीत करण्याबाबत निर्णय घेणे**

मलकापूर TP स्कीम क्र 1 भूखंड क्र 248 नगर परिषद शाळा क्र 4 जागेबाबत न प ठराव क्र 46 दिनांक 04.05.2016बाबत विचार विनिमेय करणे बाबत चे प्रकरण विषयासंबंधीची टिप्पणी सभेसमोर सादर करण्यात आली विषयावर सविस्तर चर्चा करण्यात आली चर्चेत श्री राजेंद्र वसंतराव वाडेकर श्री राजेश विश्वनाथ पाटील,विरोधी पक्षनेता श्री विजयराव जगन्नाथराव जाधव,यांनी सहभाग घेतला श्री रोहन दिलीपराव देशमुख,मोनाबाई मुकेश लालवाणी तसेच श्री राजेंद्र वसंतराव वाडेकर गटनेता यांनी 23 नगरसेवक यांचे स्वाक्षरी विषयासंबधीचे निवेदन मा अध्यक्ष महोदय यांना सादर केले

ठरविण्यात येते की, मलकापूर TPस्कीम क्र 1 भूखंड क्र 248 क्षेत्र 1.66 हे या नगर परिषद शाळा क्र 4 या जागेवर अभ्यासिका बनविण्याबाबतचा विषय न प सर्व साधारण सभा ठराव क्र 3 दि 26/10/2021 अन्वेय सभेसमोर ठेवण्यात आला होता शासन निर्णय क्र एम यु एन-2016 प्र क्र 298 नवि-18 नगर विकास विभाग मंत्रालय,मुंबई दि 06/09/2018 नुसार सदर जागा मलकापूर शिक्षण समितीला रु 1 /- या नाममात्र वार्षीक भाड्याने देण्याबाबत निर्णय घेवून त्यानुसार भाडे आकारणी करण्याबाबत नगर परिषदेने स्वविवेकानुसार निर्णय घेण्याचे नमुद करण्यात आले आहे परंतु सदर जागा रु 1 /-या नाममात्र वार्षीक भाड्याने देणे न प हिताचे नाही त्यामुळे सदर जागा न देण्यास सभेमध्ये ठरविण्यात आले

तसेच सदर जागेबाबत न्यायालयीन प्रकरण सुरु असुन न्यायप्रविष्ठ असल्याचे सभेत सांगण्यात आले परंतु या जागेवर अभ्यासिका बनविण्याबाबतचा विषयाबाबत कायदेशीर मार्गदर्शन घेण्यात यावे असे सभे मध्ये ठरले त्यानुसार न प चे विधी सल्लागार यांचेशी चर्चा करण्यात आली त्यानुसार त्यांनी सदर जागा न प ने स्वत विकसीत करण्यास काहीही हरकत नाही असे टिप्पणीत नमूद करण्यात आले आहे

मा अध्यक्ष महोदय यांनी याबाबत आलेले निवेदन सभेसमोर सादर करण्याचे निर्देश दिले त्यानुसार सभेसमोर आलेले निवेदन सादर करण्यात आली

1 श्री रोहन दिलीपराव देशमुख यांनी सादर केलेल्या निवेदनात नमूद केले आहे की विषयांकित प्रकरण सद्यस्थितीत संदर्भानुसार नागपूर उच्च न्यायालयात रिट पिटीशन क्र 3204 ऑफ 2019 अन्वये न्यायप्रविष्ठ असल्यामुळे वरील विषयांकित विचार विनिमयसह संबधीत प्रक्रिया संयुक्तीक होणार नाही

2 सौ मोनाबाई मुकेश लालवाणी यांनी सादर केलेल्या निवेदनात नमूद केले आहे की विषयांकित विषयाला माझा विरोध असून माझ्या विरोधाची नोंद प्रोसिडींग बुक मध्ये घेण्यात यावी

3 श्री राजेंद्र वसंतराव वाडेकर गटनेता यांनी 23नगरसेवकांचे स्वाक्षरीचे निवेदनात नमूद केले आहे की,मलकापूर टीपी स्कीम 1 भूखंड 248 नगर परिषद शाळा क्र 4 जागा ही नगर परिषद मालकीची असून शहराची वाढती लोकसंख्या विचारात घेवून शहरातील विद्यार्थ्यां करिता अभ्यासिकेची आवश्यकता असुन सदर जागा त्या करिता योग्य असुन अभ्यासिकेसाठी जागेची आवश्यकता असल्याने सदर जागेवर नगर परिषद द्वारे अभ्यासिका बांधण्यासाठी दिल्यामुळे नगर परिषदेची स्थावर मालमत्ता तयार होणार असून याचा लाभ शहरवासियांना होणार आहे सदर जागेवर अभ्यासिका बांधण्यास तसेच न प सर्व साधारण सभा ठराव क्र 46 दि 4/5/2016 रद्द करण्यात यावा

चर्चेत सहभागी होतांना श्री.गजेश विश्वनाथ पाटील यांनी सभागृहात सांगितले की,शासन निर्णय दि.6/9/2018 च्या निर्णयानुसार सदर जागा एक रुपया नाममात्र शुल्क ने न देणे वा तसेच न.प.मालकीच्या जागा मलकापूर शिक्षण समितीला वा इतर कोणत्याही संस्थेला आताही व भविष्यात कधीही देवू नये न.प.ने सदर जागा स्वत विकसीत करावे हे न.प.हिताचे राहिल.

श्री.राजेंद्र वसंतराव वाडेकर गटनेता यांनी चर्चेत सहभागी होतांना न.प.सर्व साधारण सभा ठराव क्र.46 दि.4/5/2016 जागा देणेबाबतचा ठराव रद्द करण्यात यावा तसेच न.प.मालकीच्या शाळा नं.4 चे जागेवर वैशिष्टयपूर्ण /विशेष वैशिष्टयपूर्ण निधीतून अभ्यासिका बांधण्यात यावी तसेच शासन निर्णय दि.6/9/2018 नुसार एक रुपया नाममात्र शुल्क ने न देण्याच्या बाबतीत शासनास न.प.प्रशासनाने केलेली कारवाई शासनाकडे सादर करण्यात यावी.

श्री.विजयराव जगन्नाथराव जाधव विरोधीपक्ष नेता हे चर्चेत सहभागी होतांना विरोधी पक्षाने विधायक व शहराचे विकास कामात सहकार्य केले असल्याने सदर जागेवर अभ्यासिका बांधण्यास हरकत नाही.

मा.अध्यक्ष महोदय यांनी सदर विषयाला श्री.राहुल दिलीपराव देशमुख व सौ.मीनाबाई मुकेश लालवाणी यांचा विरोध असल्याचे कार्यवृत्तात नोंदविण्याचे निर्देश दिले त्याप्रमाणे कार्यवृत्तात नोंद घेण्यात आली.

वरील सर्व बाबी विचारात घेवून ठरविण्यात येते की,

1. मलकापूर टीपी स्कीम क्रं.1 भूखंड क्र.248 नगर परिषद शाळा क्रं.4 जागा देणेबाबत सर्व साधारण सभा ठराव क्रं46 दि.4/5/2016 रद्द करण्यास ही सभा बहुमताने मान्यता देत आहे.
2. शासन निर्णय क्रं.एमयूएन-2016/प्र.क्रं.298/नवि-18,नगर विकास विभाग मंत्रालय,मुंबई-400032दि.17/12/2016 व शासन निर्णय क्रं.एम.यू.एन-2016 /प्र.क्रं.298/नवि-18 नगर विकास विभाग मंत्रालय,मुंबई दि.06/09/2018 निर्णयनुसार सदर जागा एक रुपया नाममात्र शुल्काने वा भाडेपट्टयाने मलकापूर शिक्षण समितीला वा इतर कोणत्याही संस्थेला आता व भविष्यात कधीही न.प.हिताचे नसल्याने देण्यात येवू नये तसे शासनास न.प.प्रशासनाने केलेली कारवाई बाबत कळविण्यास ही सभा बहुमताने मान्यता देत आहे.
3. न.प. मालकीची अभ्यासिकेसाठी मलकापूर T.P.स्कीम क्रं.1 भूखंड क्र.248 क्षेत्र 1.66 हे ही जागा भौगोलिक दृष्टया स्थान पाहता दुसरी सुयोग्य जागा न.प.कडे उपलब्ध नाही मलकापूर शहरातील सर्व स्तरातील स्पर्धा परीक्षेकरिता तयारी करणारे विदयार्थी व इतर शैक्षणीक विदयार्थी यांना याचा खूप फायदा असल्याने सदय स्थितीत मलकापूर शहराची लोकसंख्या अंदाजे 80000 च्या जवळपास आहे स्पर्धा परीक्षेची तयारी करणारे विदयार्थी मोठया शहरात अभ्यासिकेकरिता जातात त्याकरिता लागणारा खर्च सुध्दा जास्त विचारात घेवून न.प.च्या मालकीची शाळा क्रं.4 जागेवर अदयावत अभ्यासिका वैशिष्टयपूर्ण/विशेष वैशिष्टयपूर्ण योजने अंतर्गत बांधकाम करण्यास त्याकरिता येणाऱ्या खर्चास बहुमताने ही सभा मंजूरात देत आहे.

सूचक- श्री.राजेंद्र वसंतराव वाडेकर

अनुमोदक- श्री.राजेश विश्वनाथ पाटील

| **ठरावाच्या बाजू** | **ठरावाच्या विरुध्द** |
|---|---|
| 24 | 2 |

ठराव बहुमताने मंजूर

**विशेष सभेचे 1 विषयाचे कामकाज पूर्ण झाल्याने मा.अध्यक्ष महोदय यांनी उपस्थित सदस्यांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहिर केले.**

HRGawali

(हरीश महादेवसिंह रावळ)
अध्यक्ष
नगर परिषद मलकापूर

न. प. विशेष सभा

फॉर्म बी

118

नियम ४ पहा

# हजेरी बुक

सभेची तारीख 22 ... 192..

सकाळी ११ वा

| अ. क्र. | सदस्याचे नाव | | सही / अंगठा |
|---|---|---|---|
| (१) | हरीश महादेवसिंह रावळ | उपाध्यक्ष | HRawal |
| (२) | हमिदखाँ खुदूफखाँ जमादार | अध्यक्ष | [signature] |
| (३) | सरिता परवीन रईसखाँ | सदस्य | [signature] |
| (४) | रेखा प्रमोद अवसरमोल | -॥- | R P Awasarmol |
| (५) | राजेंद्र वसंतराव वाडेकर | -॥- | [signature] |
| (६) | ज्योती राजेश फुलारिकर | -॥- | R fulorkar |
| (७) | विजयराव जगन्नाथराव जाधव | -॥- | [signature] |
| (८) | राधिका किशोर नवले | -॥- | Rk navale |
| (९) | अनिल शिवराम गांधी | -॥- | [signature] |
| (१०) | अनिल मोतीलाल जैस्वाल | -॥- | [signature] |
| (११) | पुजा गोपाल राठी | -॥- | [signature] |
| (१२) | सै. तजुनिसा महेबूब | -॥- | [signature] |
| (१३) | मो. जावेद मो. सलीम कुरेशी | | [signature] |
| (१४) | मो. नाजेमा परवीन नासीर | -॥- | Nazma |
| (१५) | एजाज अहेमद अय्याज शाह | -॥- | [signature] |
| (१६) | सलमाबानो शे. इम्रान | -॥- | गैरहजर |
| (१७) | शाहजाद सलीम खान | -॥- | [signature] |
| (१८) | छाया शंकर पाटील | -॥- | श्री छायापा.. |
| (१९) | सनाउल्लाखाँ रफिउल्लाखाँ | -॥- | [signature] |
| (२०) | मेहरुन्नीसा शे रफिक | -॥- | मेहरुन्नीसा |
| (२१) | रोहन दिलीपराव देशमुख | -॥- | [signature] |
| (२२) | राजेश विश्वनाथ पाटील | -॥- | [signature] |
| (२३) | मंगला श्रीकृष्ण पाटील | -॥- | [signature] |
| (२४) | मो. जाकीर मो. इलियास | -॥- | [signature] |
| (२५) | नजमुन्निसा मो. सिद्दीक सुपडू | -॥- | नजमा |
| (२६) | अशोक दौलतराव वानखडे | -॥- | गैरहजर |
| (२७) | मिनाबाई मुकेश लालवाणी | -॥- | मीना लालवाणी |
| (२८) | इंदुबाई रामदास बगाडे | -॥- | इंदुबाई रामदास बगाडे |
| (२९) | सुहास तिलोकचंद चवरे | -॥- | [signature] |

न. प. विशेष सभा

फॉर्म बी



नियम ४ पहा

# हजेरी बुक

सभेची तारीख 22 /12/2021
सकाळी 11 वा.

| सदस्यांचे नांव | | सही / अंगठा |
| --- | --- | --- |
| नारायणदास गुरुमुखदास निहलानी | स्वीकृत सदस्य | गैरहजर |
| डॉ अनिल वसंत खर्चे | -"- | [signature] |
| दिलीप त्र्यंबकराव देशमुख | -"- | गैरहजर |